| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस<br>सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br><br>**प्रेसनोट** | 2025<br><br>CB/ 38/2025 |
| **गुन्हे शाखा, नवी मुंबई** | | **दिनांक १०.०७.२०२५** |

**हेरॉईन हा अंमली पदार्थ विक्री करणा-या टोलीस अटक एकुण ४७ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त व ०९ आरोपी अटक अंमली पदार्थ विरोधी पथक नवी मुंबई यांची कामगिरी.**

---

श्री. मिलींद भारंबे, पोलीस आयुक्त, श्री. संजय येनपुरे, पोलीस सह आयुक्त, श्री. दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांनी अंमली पदार्थ मुक्त करण्याचे व त्याचा व्यापार करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

अंमली पदार्थ विरोधी पथक, नवी मुंबई वपोनि श्री संदिप निगडे यांना दि. ०४/०७/२०२५ रोजी बातमी मिळाली की, नवी मुंबई येथे पंजाबवरुन काही इसम अंमली पदार्थ घेऊन येऊन लॉजवर राहुन अंमली पदार्थाची विक्री करतात, त्या अनुषंगाने सी-शोर लॉज, विष्णु कॉम्प्लेक्स, सीबीडी बेलापुर येथील येथे सापळा रचुन कारवाई केली. त्यांचेविरुद्ध **सी.बी.डी. पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३०२/२०२५ एन.डी.पी.एस.कायदा १९८५ चे कलम ८(क), २१(ब), २७(अ), २९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

सदर गुन्ह्याचे तपासामध्ये त्यांचे पंजाब येथुन आलेले सहआरोपीत तसेच नवी मुंबई येथील त्यांचे अंमली पदार्थाचा माल विकत घेणारे त्यांचे साथीदार असे एकुण ०९ आरोपीत यांना अटक करण्यात आलेली असुन त्यांचेकडुन एकुण १२० ग्रॅम वजनाचा ४७ लाख रुपये किंमतीचा हेरॉईन हा अंमली पदार्थाचा माल जप्त करण्यात आलेला आहे.

**अटक आारोपीतांची नावे :-**

१) परमजीतसिंग महिंदरसिंग रा.पीरावल, सुराखपुर, कपुरथला, पंजाब,

२)सुखविंदर दारा सिंग, रा.तुड, जिल्हा-तरंतरान, राज्य-पंजाब, यांना दि. ०४/०७/२०२५ रोजी २०.३० वा अटक केली.

३) अरविंद रामशंकर प्रसाद (उर्फ डिझेल) वय-३० वर्षे, रा.आग्रोळी गाव, सेक्टर-२९, मंगलज्योत बिल्डींग, बेलापुर, नवी मुंबई

४) मनप्रित पप्पु कुमार सध्या रा दिवाळे गाव, बेलापुर, नवी मुंबई मुळ पंजाब,

५) मोनु चंदेर सिंग रा.दिवाळे गाव, बेलापुर, नवी मुंबई, मुळ रा. पंजाब,यांना दि. ५/०७/२०२५ रोजी १४.३० वा अटक केली.

६)हरप्रित सिंग तारसेम सिंग (उर्फ हॅप्पी ) रा. दिवाळे गाव, बेलापुर, नवी मुंबई मुळ रा. पंजाब.

७) गुरप्रित सिंग बलविदंर सिंग भत्ती उर्फ पाडा रा.सीबीडी बेलापुर, नवी मुंबई, मुळ रा.पंजाब. यांना दि. ०७/०७/२०२५ रोजी १३.०० वा अटक केली. वरील आरोपींना पोलीस कस्टडी मंजुर झाली असुन सध्या पोलीस कोठडीध्ये आहेत.

८) सतनामसिंग सुखदेवसिंग रा.तोड,ता. खदुरसाहिल,जि. तरंतारन पंजाब .
९) सुखविंदरसिंग मुकनारसिंग खदुरसाहिल,जि.तरंतारन पंजाब,यांना दि. ०९/०७/२०२५ रोजी १४.३० वा अटक केली.

सदरची कामगिरी श्री. अशोक राजपुत, सहा. पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वपोनि /संदीप निगडे, सपोनि /निलेश धुमाळ, सपोनि सुरज गोरे, पोहवा/१३७७ रमेश तायडे, पोहवा ज्ञानेश्वर बनकर, पोशि/४४८२ कृष्णराज धोंडे, पोशि/खिल्लारे, चालक पोशि/जय पाटील, चालक पोशि परमेश्वर भाबड यांनी केली आहे.

★★★★★★★★★★